सत्यमेव जयते
स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

महाराष्ट्र शासन - वन विभाग

**कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल**

मु.पो. - कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा - सांगली - 416309 महाराष्ट्र
दूरध्वनी क्रमांक - 02346 - 271212 ई-मेल - princpalkundal@gmail.com

# सेवानिवृत्त सहयोगी प्राध्यापक (अभियंता) यांची सेवा करार पध्दतीने पद भरती करणेबाबतची जाहिरात

कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल येथे सहयोगी प्राध्यापक (अभियंता) या पदावर एका सेवानिवृत्त अधिका-याची सेवा करार पध्दतीने कुंडल वन अकादमी येथील विवक्षित कामाकरीता नेमणूक करणेची आहे. त्यासाठी खालील अटी व शर्तीची पूर्तता करणारे सेवानिवृत्त वनअभियंता/कार्यकारी अभियंता/उप अभियंता (CIVIL) यांचे अर्ज मागविणेत येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे स्वरुप | भरावयाचे पद | भरावयाची पद संख्या |
|---|---|---|---|
| 1 | 1. प्रबोधिनीच्या आवारातील सर्व इमारती व परिसर देखभाल व दुरुस्तीकामी तांत्रिक मार्गदर्शन करणे.<br>2. अकादमीच्या स्थापत्य बांधकामाविषयीची अंदाजपत्रके बनविणे व त्यासंबंधी तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन घेणे.<br>3. प्रशिक्षणार्थी वनक्षेत्रपाल व पदोन्नत वनपाल यांना वनविभागातील क्षेत्रीय कामासंदर्भात स्थापत्यशास्त्र विषयांवर व्याख्यान देणे.<br>4. प्रबोधिनीकडील सौर उर्जेवरील विज निर्मिती प्रकल्पाची देखभाल व सुस्थितीत ठेवण्यासाठी आवश्यक ते मार्गदर्शन.<br>5. प्रबोधिनीकडील बी.एस.एन.एल. इंटरनेट सेवा सुस्थितीत ठेवणेबाबत आवश्यक ते नियंत्रण ठेवणे.<br>6. इतर अनुषंगिक कामे. | सहयोगी प्राध्यापक (अभियंता) | 01 |

**अर्ज सादर करणेचा कालावधी** :- दिनांक 10/04/2023 ते अंतिम दिनांक 25/04/2023अखेर (सायंकाळी 5.00 वाजेपर्यत) पर्यतचा आहे. सदरचा अर्ज हा खालील पत्यावर लिखित स्वरुपात समक्ष, पोस्टाद्वारे अथवा ईमेलद्वारे सादर करावा. अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व इतर तत्सम कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती जोडाव्यात. अर्जासोबत सेवानिवृत्ती वेळी मिळत असलेल्या वेतनाचा तपशिल जोडावा.

**अर्ज सादर करणेचा पत्ता** :- महासंचालक, कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल, क्रांती सहकारी साखर कारखानाशेजारी, कुंडल विटा रस्ता, ता.पलूस, जि. सांगली 416309

**अटी व शर्ती** :-

1. वनविभागाकडील वन अभियंता किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाकडील कार्यकारी अभियंता, उप अभियंता (CIVIL) या पदावरुन सेवानिवृत्त झालेला असावा.
2. कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल येथे निवासी प्रशिक्षण आयोजित केले जात असून कुंडल अकादमी मध्ये निवासस्थानी राहणे अनिवार्य राहील.
3. प्रशिक्षणार्थी वनक्षेत्रपाल व पदोन्नत वनपाल यांना वनविभागातील क्षेत्रीय कामासंदर्भात स्थापत्यशास्त्र विषयांवर व्याख्यान देणे.
4. वनक्षेत्रपाल, वनपाल या संवर्गाच्या दौ-यामध्ये सहभागी होऊन अभ्यासदौ-याचे अनुषंगाने कार्यवाही करणे.
5. सदरची सेवा ही सेवा करार पध्दतीने असल्याने नियुक्तीची सेवा समाप्त करण्याचा अधिकार कुंडल वन अकादमीस राहील.
6. इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांचेविरुध्द वनविभागात अथवा सेवानिवृत्तीपूर्वी कार्यरत असलेल्या विभागात कोणत्याही प्रकारची विभागीय चौकशी अथवा न्यायालयीन प्रकरण प्रलंबित नसावे.
7. नियुक्तीचे कालावधीत करारपध्दतीने विवक्षित कामे पूर्ण करण्याची जबाबदारी राहील.
8. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. संकिर्ण -2715/प्र.क्र.100/13 दि. 17 डिसेंबर 2016 अन्वये विहित केलेल्या अटी व शर्ती तसेच विभागाने निश्चित केलेल्या अटी व शर्ती बंधनकारक राहतील.
9. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र. संकिर्ण -2715/ प्र.क्र.100/13 दि. 17 डिसेंबर 2016 मधील तरतूदीनूसार मासिक व पारिश्रमिक भत्ते देण्यात येतील.
10. सदरची नियुक्ती ही करार पध्दतीने असल्यामुळे नियमित सेवेत घेण्याबाबत अथवा कोणत्याही हक्कांची मागणी करता येणार नाही.
11. करार पध्दतीने नियुक्ती करावयाचा सेवानिवृत्त अधिकारी हा शारिरीक, मानसिक व आरोग्याच्या दृष्टीने सक्षम असावा. तसेच, प्रस्तावित सेवांसाठी त्यांच्याकडे क्षमता असावी

सविस्तर जाहिरात कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडलचे www.kundalforestacademy.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत आली आहे. अर्ज करण्यासाठी अर्ज नमूना सोबत उपलब्ध असेल तसेच यासाठी दिलेल्या अटी व शर्तीची पूर्तता करण्यात आले नंतरच नियुक्ती देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

(जे.पी. त्रिपाठी, भा.व.से)

**महासंचालक**

महाराष्ट्र शासन - वन विभाग
कुंडल विकास, प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने) कुंडल
मु.पो. - कुंडल, तालुका - पलुस, जिल्हा - सांगली - 416309 महाराष्ट्र
दूरध्वनी क्रमांक - 02346 - 271212 ई-मेल - princpalkundal@gmail.com

## सेवानिवृत्त सहयोगी प्राध्यापक (अभियंता) यांची सेवा करार पध्दतीने पद भरती करणेकरीता

## अर्जाचा नमुना

रंगित फोटो

प्रति,

महासंचालक,

कुंडल विकास प्रशासन व व्यवस्थापन प्रबोधिनी (वने), कुंडल

विषय :- सहयोगी प्राध्यापक (अभियंता) या पदासाठी अर्ज.

संदर्भ :- दैनिक.............................दिनांक........................मधील जाहिरात.

महोदय,

मी आपली संदर्भिय जाहिरात वाचली असून माझा वैयक्तिक तपशिल खालीलप्रमाणे आहे.

12. संपूर्ण नाव :-
13. जन्मतारीख अक्षरी व अंकी :-
14. संपूर्ण पत्ता :-
15. मोबाईल क्रमांक :-
16. ईमेल आयडी :-
17. शैक्षणिक पात्रता :-
18. सेवानिवृत्त अधिकारी/कर्मचारी पदनाम :-
19. शासकीय सेवेत रुजू दिनांक :-
20. शासकीय सेवेत सेवानिवृत्तीचा दिनांक
21. सेवानिवृत्ती च्या वेळेचे वेतन अथवा
    सेवानिवृत्ती वेळचे निवृत्ती वेतन :-
22. अनुभव :-

ठिकाण :-

दिनांक :-

अर्जदाराचे संपूर्ण नाव व सही

(टिप :- अर्जासोबत शैक्षणिक पात्रता व इतर तत्सम कागदपत्रांच्या छायांकित सत्यप्रती आणि सेवानिवृत्ती वेळी घेत असलेले वेतन अथवा सेवानिवृत्ती वेतन मिळत असलेला तपशिल जोडावा.)